जनसंपर्क कक्ष
28 JAN 2023
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रीको- रोमन कुस्ती स्पर्धेवर पंजाब-हरियाणाच्या कुस्तीपटूंचे वर्चस्व

## मोहाली, चंडीगड, भटिंडा, राजस्थान विद्यापीठांना सुवर्णपदके

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : मल्लांची ताकद, चिवटपणा आणि निर्णयक्षमता यांचा कस पाहणाऱ्या ग्रीको- रोमन प्रकारांतील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धांना शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी पंजाब-हरियाणाच्या कुस्तीपटूंनी जबरदस्त खेळाचे प्रदर्शन करीत स्पर्धेवर वर्चस्व गाजविले. विविध वजनी गटांच्या कुस्तींमध्ये चंडीगड विद्यापीठ (मोहाली), पंजाब विद्यापीठ (चंडीगड), गुरू काशी विद्यापीठ (भटिंडा) आणि सिंघानिया विद्यापीठ (राजस्थान) या चार विद्यापीठांनी सुवर्णपदक जिंकले.

पुरुषांच्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा २२ जानेवारीपासून विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सुरू आहेत. या स्पर्धेतील फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धांचा पहिला टप्पा पार पडल्यानंतर शुक्रवारपासून (दि. २७) ग्रीको- रोमन प्रकारांतील कुस्ती स्पर्धांना प्रारंभ झाला. स्पर्धेत देशभरातील १३१ विद्यापीठांचे ८९४ कुस्तीपटू सहभागी झाले.

ग्रीको- रोमन स्पर्धेच्या पहिल्या दिवशी ५५ किलो, ६३ किलो, ७२ किलो आणि ८२ किलो या चार वजनी गटांतील कुस्ती स्पर्धा झाल्या.




शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ग्रीको- रोमन कुस्ती स्पर्धेमधील विविध गटांतील सामन्यांमधील चुरशीचे क्षण. (छाया : नसीर अत्तार)

### शिव- वार्ता, महाखेल वाहिन्यांद्वारे थेट प्रक्षेपण

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या या स्पर्धेचे विद्यापीठाच्या 'शिव- वार्ता' आणि 'महाखेल कुस्ती' या यू ट्यूब वाहिन्यांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येत असून शेकडो कुस्तीप्रेमी नागरिक व विद्यार्थी या स्पर्धेचा ऑनलाइन आनंदही घेत आहेत.

स्पर्धकांच्या तयारीचा कस पाहणाऱ्या या स्पर्धेतील अनेक लढती डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या होत्या. ७२ आणि ८२ किलो वजनी गटांतील लढती अत्यंत चुरशीच्या झाल्या. शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंची वाटचाल या चार गटांमध्ये बाद फेऱ्यांतच थांबली.

स्पर्धेत आज, शनिवारी ६० किलो, ६७ किलो, ७७ किलो आणि ९७ किलो या वजनी गटांतील, तर अखेरच्या दिवशी, रविवारी (दि. २९) ८७ व १३० किलो गटांतील सामने होतील. शुक्रवारी सकाळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते स्पर्धेस प्रारंभ करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 JAN 2023 पुढारी

## मोहाली, चंदीगड, भटिंडा, राजस्थान विद्यापीठांना सुवर्णपदके


# पंजाब-हरियाणाच्या पैलवानांचे वर्चस्व

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शड्डू ठोकत प्रतिस्पर्ध्यांची ताकद आजमावत, मॅटवरील चिवटपणा आणि लढतीतील निर्णयक्षमता यांचा कस पाहणाऱ्या ग्रीको-रोमन प्रकारांतील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धांना शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी पंजाब-हरियाणाच्या कुस्तीपटूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेवर वर्चस्व गाजविले. चंदीगड विद्यापीठ (मोहाली), पंजाब विद्यापीठ (चंदीगड), गुरू काशी विद्यापीठ (भटिंडा) आणि सिंघानिया विद्यापीठ (राजस्थान) या चार विद्यापीठांनी सुवर्णपदकांची कमाई केली.

अ.भा. आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धा

स्पर्धेत देशभरातील १३१ विद्यापीठांचे ८९४ कुस्तीपटू सहभागी झाले आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते मॅटपूजन व विविध वजनी गटांतील सलामीच्या कुस्त्या लावून स्पर्धेस प्रारंभ झाला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अ.भा. आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेतील अटीतटीचा एक क्षण.**

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय रेफरी नवनाथ ढमाळ आदी उपस्थित होते.

पहिल्या दिवशी ५५ किलो, ६३ किलो, ७२ किलो आणि ८२ किलो या चार वजनी गटांतील कुस्ती स्पर्धा झाल्या. शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंची वाटचाल या चार गटांमध्ये बाद फेऱ्यांतच थांबली. आता उर्वरित सहा वजनी गटांमध्ये त्यांना पदकासाठी विशेष परिश्रम घ्यावे लागणार आहे.

सकाळ



**शिवाजी विद्यापीठ : ध्वजवंदन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आदी.**

# शिवाजी विद्यापीठ

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. कुलगुरूसह मान्यवरांनी विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. रामचंद्र पोवार, सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
28 JAN 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे सर्वसमावेशक राष्ट्रवादाचे प्रणेते : पवार

## शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप



शिवाजी विद्यापीठातील दोन दिवसीय चर्चासत्रात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. माणिकराव साळुंखे, जयसिंगराव पवार, प्र. कुलगुरू पी. एस. पाटील, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महर्षी शिंदे विचारवंताच्या विचारधारेमध्ये न सामावणारे व्यक्तिमत्त्व आणि सर्वसमावेशक राष्ट्रवादाचे प्रणेते आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त आयोजित केलेल्या 'महर्षी शिंदे आणि सर्वसमावेशक भारताची संकल्पना' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

पवार पुढे म्हणाले, भारतीय अस्पृश्यतेचे मूलभूत चिंतन महर्षींचे जीवित कार्य होते. विचारवंताच्या विचारधारेमध्ये न सामावणारे व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू पी. एस. पाटील यांनीही मनोगते व्यक्त केली.

अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्तविक केले. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. या प्रसंगी प्रा. अशोक चौसाळकर, किशोर बेडकिहाळ, प्रा. प्रकाश पवार, डॉ. अवनिश पाटील, सुशील धसकटे, डॉ. दत्ता घोलप उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे हिने आभार मानले. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

तरुण भारत

# विद्यापीठात मतदार दिनानिमित्त प्रतिज्ञा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी १३ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त लोकशाही परंपरांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिज्ञा घेण्यात आली. विद्यापीठाच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी अँड इलेक्शन्स फॉर गुड गव्हर्नन्स''च्या वतीने कार्यक्रम झाला. केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी मतदारांसाठीच्या प्रतिज्ञेचे वाचन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. तृप्ती करेकट्टी आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# 'महर्षी वि. रा शिंदे यांचे कार्य उपेक्षितच'

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनातील विविध पैलूंवर अभ्यास केला पाहिजे. कारण तरूण पिढीला वि. रा. शिंदे यांच्या विचारांची गरज आहे. त्यांच्या कार्याची दखल फारशी घेतली नाही. त्यामुळे त्यांचे कार्य उपेक्षित राहिले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त या कार्यशाळेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. याप्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बेडकीहाळ म्हणाले, महात्मा गांधी आणि विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या कार्यातून समाजाला दिशा दिली. परंतु या दोन्ही नेत्यांच्या कार्याला समाजातील काही घटकांनी दुर्लक्षीत केले. समाजसुधारणा करताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्य स्वातंत्र्यापूर्वीचे आहे. त्याकाळी त्यांनी शेती, समाज सुधारण्यासाठी उपस्थित केलेले प्रश्न आजही जसेच्या तसे आहेत. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रा. गोपाळ गुरु, प्रा. अशोक चौसाळकर, प्रा. सुनीलकुमार लवटे, ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, प्रा. प्रकाश पवार, डॉ. अवनिश पाटील आदी उपस्थित होते.

लोकमत

# १८ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील १२ आणि आजअखेर १८ अभ्यासक्रमांचे निकाल शुक्रवारपर्यंत घोषित करण्यात आले आहेत. दिवसभरात एकूण ४० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये पार पडल्या.

ऑक्टोबर आणि नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा २ जानेवारीपासून सुरू झालेल्या आहेत. शुक्रवारी वाणिज्य, विज्ञान, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स, फार्मसी, बीबीए, विधी, आर्किटेक्चर, नर्सिंग, बीएबीएड, इंजिनिअरिंग, ॲग्रीकल्चर, व्होकेशनसह एकूण ४० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने सुरळीतपणे पार पडल्या.